अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. ०५ जून २०२५ | वर्ष १० वे | अंक ४३ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये!

## आयोगाकडून राज्य सरकारला प्रभाग रचनेसंबंधी सूचना

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील रखडलेल्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी चार आठवड्यांमध्ये प्रक्रिया सुरू करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने तशी पावले टाकली आहेत. प्रभाग रचनेसाठी राज्य सरकारला सूचना करण्यात आली असून, राज्य सरकारकडून प्रभाग रचनेची माहिती निवडणूक आयोगाकडे प्राप्त झाल्यावर आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने गेल्याच महिन्यात निवडणुकांची प्रक्रिया चार महिन्यांत पूर्ण करण्याचा आदेश दिला. तसेच चार आठवड्यांत अधिसूचना जारी करण्याचा निर्देश दिला होता. यानुसार राज्य निवडणूक आयोगाने प्रक्रिया सुरू केली आहे. प्रभाग रचनेचे अधिकार महाविकास आघाडीच्या काळात सरकारने स्वत:कडे घेतले होते. यानुसार प्रभाग रचना पूर्ण करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिला आहे. राज्य सरकारकडून प्रभागांची रचना करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. राज्य सरकारकडून या आठवड्यात प्रभाग रचनेची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सादर केली जाण्याची शक्यता आहे.

प्रभाग रचनेवर राज्य सरकारकडून माहिती प्राप्त झाल्यावर प्रभागांचे आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची पुढील प्रक्रिया पार पाडली जाईल. प्रभाग रचना, आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम झाल्यावर मगच प्रत्यक्ष निवडणुका घेतल्या जातील.

### निवडणुका ऑक्टोबरमध्ये?

**सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला असला तरी या मुदतीत म्हणजे सप्टेंबरपर्यंत ही प्रक्रिया पार करणे शक्य नाही. मुदतवाढीसाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला मुभा दिली आहे. यानुसार कदाचित राज्य निवडणूक आयोग सर्वोच न्यायालयाकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करू शकतो. प्रत्यक्ष निवडणुका ऑक्टोबरमध्ये दोन टप्प्यांमध्ये होण्याची शक्यता आहे.**

# ठगबाज महिलेने अनेक बेरोजगारांना गंडविले

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात फसवणूकीचे प्रमाण वाढत असून, त्यात बेरोजगार फसवणूकीला बळी पडत आहेत. नौकरी लावून देण्याचे अमिष दाखवून बंटी बबलीच्या जोडीने लाखांदूर तालुक्यात बेरोजगार तरूणांची फसवणूक केल्याची घटना ताजी असतांनाच, ब्रम्हपुरी तालुक्यात सुद्धा याच जोडीने आणखी दोघांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. ब्रम्हपुरी शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मालडोंगरी गावातील बेरोजगारांची नौकरी लावून देण्याच्या बहाण्याने बबलीने १०.५ लाखांनी आर्थिक फसवणूक केली आहे.

सौरभ प्रफुल पारधी वय २२ राह. मालडोंगरी असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादी सौरभ हा शहरातील विदर्भ इस्टेट कॉलनी ३ मधील आरोपी रोषनी रोमल नाकतोडे वय २९ वर्षे हिच्या घरी सन २०२२ पासून दूधाची विक्री करायचा. त्यामुळे फिर्यादाची रोषनी सोबत चांगली ओळख होती. आरोपीने फिर्यादीस स्वत: गडचिरोली येथील शासकीय दवाखान्यात डॉक्टर पदावर व सासरे खुशाल नाकतोडे पीडब्लूडी विभागात नौकरीस असल्याचे सांगितले. मंत्रालयात मोठ्या अधिकाऱ्यांसोबत ओळखीचे असून मेहुणा व लहान बहिणीला नौकरीस लावून दिल्याचे फिर्यादी सौरभ यास सांगितले. फिर्यादीस नौकरीला लावून देण्यासाठी २.५ लाखांची मागणी केली. फिर्यादीचे आरोपीशी घरगुती व आपसी संबंध असल्यामुळे फिर्यादीने व त्याच्या कुटूंबीयांनी आरोपी रोषनीवर विश्वास ठेवला. सोबतच आरोपीने फिर्यादीचे कुणी मित्र असल्यास त्यानाही नौकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. फिर्यादी सौरभ व त्याचा मित्र करण अनिल करंबे वय २२ रा. चांदली यास गडचिरोली, वडसा, कुरखेडा येथील शासकीय विभागात वार्ड बॉयच्या जागेवर नौकरी लावून देण्याचे आश्वासन दिले. फिर्यादी सौरभचा विश्वास जिंकण्यासाठी तिने बँक ऑफ बडोदा येथील खात्याचा कोरा चेक दिला. तिच्यावर विश्वास ठेवून फिर्यादी सौरभच्या वडिलांनी ५० हजार रोख व दुसऱ्या दिवशी २ लाख असे २.५ लक्ष रूपये पाठविले. आरोपी रोषनी रोमल नाकतोडे हिने वेळोवेळी फिर्यादी सौरभ यांचेकडून ५लाख ९९ हजार ७०० रूपये व करण करंबे याचेकडून ४ लाख ५१ हजार ६०० असे एकुण १० लाख ५१ हजार ३०० रूपये नौकरी लावून देतो म्हणून मागितले. पैसे देऊन सुद्धा नौकरी न मिळाल्यामुळे हताश झालेल्या फिर्यादी सौरभ व त्याचा मित्र करण यांनी आरोपी रोषनी रोमल नाकतोडे हिचे विदर्भ इस्टेट मालडोंगरी रोड येथील घरी गेले असता, घर बंद अवस्थेत दिसून आले. सोबतच लाखांदूर पोलिस स्टेशन, जि. भंडारा येथे फसवणूकीचा गुन्हा दाखल झाल्याचे नोटीस वरून फिर्यादीस माहित झाले.

फिर्यादी सौरभ यास फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात आरोपी रोषनी रोमल नाकतोडे विरूद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



## संपादकीय...

# आधी आरोप, मग वादंग अन् शेवटी संवाद!

इंग्रजी दैनिकाच्या एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यातून तसेच ध्वनीत होत आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यापैकी कोण उत्तमरित्या संवाद साधू शकतो, असे देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आले. त्यावर त्यांनी दोघेही संवादात कमी पडत असल्याचे सांगितले आणि या स्पष्ट मताबद्दल दोघांकडे दिलगिरीही व्यक्त केली. याचप्रमाणे यावर्षी मान्सून कसा असेल, याचे भाकीत भारतीय हवामान खात्याबरोबरच स्कायमेटनेही वर्तविले आहे. पण महाराष्ट्रासह देशातील राजकारणाची समीकरणे कधी आणि कशी बदलतील, हे कोणालाच सांगता येणार नाही. गेल्या सहा वर्षांत राज्यातील नागरिकांनी याचा पुरेपूर अनुभव घेतला आहे आणि घेतही आहेत. २०१९ मध्ये ज्यांच्याविरुद्ध लढले त्यांच्याबरोबरच सत्ता स्थापन केल्याचा प्रकार सर्वांनीच पाहिला. त्यानंतर आपलाच पक्ष फोडून तो आपल्या नावावर करण्याचा अजब प्रकार करणारे साक्षीदार तमाम महाराष्ट्रीय नागरिक बनले. तर गेल्या महिन्यात म्हणजेच एप्रिलमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे एकत्र येण्याचे स्पष्ट संकेत मिळाले. आता वास्तवात ते कितपत खरे आहे, हा प्रश्नच आहे. एकूणच वारे कधी आणि कुठून वाहतील याचा काहीच अंदाज देता येणार नाही. फक्त एवढेच ठामपणे सांगता येऊ शकते की, भाजपा काहीही घडवू शकतो.

देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांनी आम्हाला धोका दिल्याचे म्हटले आहे. अशा परिस्थितीत राजकारणामध्ये हातावर हात ठेवून शांत बसता येत नाही. येथे मार्ग शोधून जिवंत राहावे लागते असे ते म्हणाले. मग २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजप आणि शिवसेनेची सुमारे २५ वर्षांची युती तोडण्यात आली याशिवाय २०१९ मध्ये शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देण्याचे वचन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते पण ते पाळले गेले नसल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी केला होता. हा धोका नव्हता का? २०१९ मध्ये शिवसेनेने महाविकास आघाडीचा नवा मार्ग शोधला होता हे मान्य करणार का? विशेष म्हणजे, फडणवीस यांनी या मुलाखतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचे कौतुक केले. निवडणुकीत जय असो वा पराजय शरद पवार हे आपले कार्य सातत्याने सुरूच ठेवतात असे फडणवीस म्हणाले. त्यातच दुसरीकडे शरद पवार समर्थक नेते भाजपात जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. त्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली असली तरी फडणवीस यांच्या संवादाची ही सुरुवात आहे का?

केवळ 'फेव्हिकॉलचा जोड आहे' असे म्हणावे लागते पण त्याचा तकलादूपणा न सांगताही दिसतो. विधानसभा निवडणुकीच्या वेळी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे श्रेय घेण्यात दोन्ही नेते आघाडीवर होते. पण निवडणुकीनंतर या योजनेचे निकष अधिक कठोर करून लाडक्या बहिणींची संख्या कमी करण्यास महायुती सरकारने सुरुवात केली. त्यासाठी आर्थिक नियोजनाची सबब अजित पवार प्रमुख असलेल्या अर्थ विभागाने दिली आहे. याशिवाय, शिंदे गटाच्याच दोन मंत्र्यांच्या खात्यातील निधी या योजनेसाठी वळविण्यात आल्याने दोन पक्षांतील धुसफूस चव्हाट्यावर आली होती.

मुळात, महाविकास आघाडी सरकारच्या काळात एकनाथ शिंदे यांच्याशी देवेंद्र फडणवीस यांनी कशा प्रकारे संवाद साधला याची तपशीलवार माहिती दस्तुरखुद्द एकनाथ शिंदे यांनीच २०२२ मध्ये राज्य विधिमंडळात दिली. रात्री उशिरा आमच्या भेटीगाठी व्हायच्या असे शिंदे म्हणाले होते. तर फडणवीस हे हुडी घालून रात्री उशिरा घराबाहेर पडत असत अशी माहिती त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना दिली होती. तर एकवेळ सत्तेशिवाय राहू पण राष्ट्रवादी कॉंग्रेसबरोबर युती करणार नाही, असे त्रिवार सांगतानाच फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना, 'आपद्धर्म नाही, शाश्वत धर्म नाही, कुठलाही धर्म नाही' असे ठासून सांगितले होते. पण जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसला सत्तेत सहभागी करून घेतलेच! बहुदा भाजपला अशाच प्रकारचा संवाद अपेक्षित असावा.

'आधी आरोप, मग वादंग अन् शेवटी संवाद' हीच भाजपाची मोडस ऑपरेंडी पाहायला मिळते. विविध पक्षांतील बडे नेते याच पद्धतीने भाजपच्या तंबूत गेल्याचे सर्वांनीच पाहिले. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे संवादात कमी पडत असल्याचे फडणवीस यांनी म्हटले असले तरी हे दोन नेते एकमेकांशी संवाद कमी आणि कुरबूर जास्त करत असल्याचेही अनेकदा समोर आले आहे. महायुती सरकारमध्ये सर्वकाही आलबेल असल्याचे वरून कितीही दाखवले जात असले तरी 'दिसते तसे नसते' हेच खरे. बर्फ हा नेहमी नऊ दशांश पाण्याखाली असतो आणि एक दशांश वर दिसतो. या नऊ दशांश गोष्टी अशा असतात की त्यांची वाच्यता जाहीरपणे करता येत नाही.

# मारहाणीत गर्भवतीच्या पोटावर लाथ मारल्याने पोटातील बाळाचा मृत्यू

## मंच्युरियन स्टॉल लावण्यावरून झाला वाद, ६ जणांवर गुन्हा नोंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

घरासमोर मंच्युरियन स्टॉल लावण्यावरून झालेल्या वादात आरोपींनी एका गर्भवती महिलेच्या पोटावर लाथा, बुक्यांनी मारहाण केल्याने पोटातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या घटनेचे संपुर्ण ब्रम्हपुरी तालुक्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सहा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पूजा सचिन लोणारकर (२९) असे पिडीत महिलेचे नाव आहे. तर आरोपींमध्ये राकेश मरस्कोल्हे, ममता मरस्कोल्हे, गोलू मरस्कोल्हे यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीतेचा पती आरोपींच्या घरासमोर मंच्युरियन स्टॉल लावत होता. आरोपीने स्टॉल लावण्यासाठी रोखले पण सचिनने ऐकले नाही. यामुळे दि. २७ मे रोजी रात्री ८.३० वाजता त्यांच्यात भांडण झाले. यात पतीला मारहाण सुरू असल्याने पतीला वाचवण्यासाठी पुजा गेली असता आरोपींनी तिलाही लाथा बुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत पुजाच्या पोटाला लाथ लागल्याने तिला असह्य वेदना होऊ लागल्या, लगेच तिला ब्रह्मपुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी पोटातील बाळाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. पूजाच्या तक्रारीवरून पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. आरोपीच्या तक्रारीवरून पूजाचा पती सचिन विरुद्धही मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाद कोणताही असो पण या वादात पोटातील निरागस बाळाचा काय दोष ? पोलिस प्रशासन आरोपींवर काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बौध्द बांधवांनी एकत्र यावे

## भदंत आनंद महाथेरो यांचे पत्रपरिषदेतून आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच सुरू असलेल्या बौद्धगया महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी आतापर्यंत अनेक चळवळी व आंदोलने करण्यात आली. तेथील प्रशासन व पोलिस शांतपणे सुरू असलेली चळवळ मोडून काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. महाविहाराच्या मुक्तीसाठी नवी दिल्ली येथील अखिल भारतीय बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष भदंत आनंद महाथेरो बुद्धगया यांनी पत्रकार परिषदेत दि.२६ मे रोजी मागणी केली की,महाबोधी महाविहार त्वरित मुक्ती करण्यात यावे व महाबोधी महविहार बौध्द समाज बांधवाला सोपवावा, यासाठी बौध्द बांधवांनी एकत्र येत लढा देण्याचे आवाहन केले.



बौद्धगया महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनासाठी सन १९४९ मध्ये लावण्यात आलेला बीटी कायदा रद्द करण्यात यावा. मागणी करण्यात आलेल्या निवेदनाच्या प्रति बिहार राज्याचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचेसह बिहारचे राज्यपाल, राष्ट्रपती, प्रधानमंत्री भारत सरकार नवी दिल्ली, देशाचे गृहमंत्री, व राष्ट्रीय अल्प संख्याक आयोग ,भारत सरकार नवी दिल्ली इत्यादींना पाठविण्यात आले असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.

बुद्ध जयंती संपन्न होत असताना बिहारच्या राज्यपालांनी महाविहारातील बुद्धाच्या प्रतिमेकडे पाठ फिरवून आणि तिथे असलेल्या स्तूपाला शिवलिंग मानून भगवान शिवाची पूजा केली. त्यामुळे बौद्ध धर्माच्या अनुयायांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आंदोलनांला अधिक तीव्र करण्यासाठी दि. ०५ जून रोजी भारताची राजधानी दिल्लीत एक दिवसाचा धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या आंदोलनामध्ये प्रत्येक बौध्द बांधवांनी हजर करण्याचे आवाहन करण्यात आले. पत्र परिषदेत भदंत आनंद महाथेरो, भदंत आर्य केसिरस लामा कान्हान, डॉ. राजकुमार शेंडे, गुणवंत डोर्लीकर इत्यादी उपस्थित होते.

### विनोदिनी

सागर शनिवारी नखे कापत बसला होता... ते पाहुन त्याचे आजोबा म्हणाले, 'बाळा शनिवारी नखे कापू नयेत.'

सागर : मी अंधश्रध्दाळू नाही. असल्या कथ मी मानत नाही..

आजोबा : ही अंधश्रध्दा नसून व्यावहारिक सोईसाठी केलेला नियम आहे. शनिवारी नखे कापली तर शनिवारी व रविवारी रात्री बियरचे कॅन उघडण्यास अवघड जाते... चिवडा, चकलीच्या वेफरची पॉकिटे चटकन उघडता येत नाही आणि नखं कापताना जखम झाली तर रविवारी मटण खातांना बोटाची आग होते...

सागर : धन्यवाद आजोबा... हे ज्ञानामृत मला दिल्याबद्दल मी तुमच्या चरणी नतमस्तक आहे..!!!

# ब्रम्हपुरीतील १७ लाख रुपये खर्चून बांधलेले शौचालय पाण्याविना बंद

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पटांगणावर येणाऱ्या नागरिकांची गैरसोय

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एकमेव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पटांगणाचे नुतनीकरण करण्यात येत आहे. त्यातील बरेच काम पूर्णत्वास आले आहे. त्यामुळे सकाळ-सायंकाळी पटांगणावर नागरिकांसह विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पहावयास मिळते. सन २०२४ ला पटांगणाच्या बाजूला १७ लक्ष रुपये खर्चून शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. मात्र, पाण्याची सुविधा नसल्याने येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांसह नागरिकांची गैरसोय होत आहे. विशेषतः महिलांना त्रास सहन करावा लागत आहे.



विद्यानगरी, शिक्षणाचे माहेरघर यासह क्रीडानगरी म्हणून शहराची ओळख निर्माण झाली आहे. हजारो खेडाळू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पटांगणावर सकाळ सायंकाळ सराव करतात. तर वयोवृध्द नागरिकही फेरफटका मारायला येथे येतात. सध्या पटांगणावर क्रिकेट, व्हॉलीबॉल, हॉकी यासारखे अनेक खेळांचा सराव करण्यात येतो. तर अनेक धावपटू देखील याठिकाणी सराव करतात. मात्र, शौचालयाची कोणतीही सुविधा नसल्याने नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. प्रामुख्याने महिलांना कुचंबना सहन करावी लागत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत दि. २१/१२/२०२३ च्या कार्यादेशान्वये अंदाजपत्रकीय किंमत २१,७३,९९१ रुपये नुसार १६,७०९,२९ (२३.१४ टक्के कमी) दराने दि. २१/६/२०२४ ला शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. मात्र, याठिकाणी पाण्याची कोणतीही सुविधा नसल्याने हे शौचालय कुलूपबंद अवस्थेत आहे. पाण्याची कोणतीही सुविधा न करता शौचालयाचे बांधकाम कसे करण्यात आले असा प्रश्न नागरिकांकडून विचारण्यात येत आहे. या शौचालयाच्या अगदी लागून जलतरण तलाव आहे. या जलतरण तलावाला मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य टाकीतून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे शौचालयाला देखील पाणी उपलब्ध करून देता आले असते असाही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

> **तत्कालीन अभियंत्यांनी अंदाजपत्रकात पाणी पुरवठ्याचा समावेश केला नव्हता. शौचालयाच्या आतील नळ फिटिंग पूर्ण करण्यात आली आहे. साधारण शंभर मीटर पाईप लांबवून शौचालयात पाण्याची व्यवस्था करण्यात येऊन शौचालय सुरु करण्यात येणार आहे.**
> **- आशिष बंडावार, अभियंता, नगरपरिषद ब्रम्हपुरी**

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती म्हणजे साक्षात स्त्री शक्तीचा जयघोष - प्रा. देशकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

'भारतीय इतिहासात मोठ-मोठी युद्ध झाली. अनेक साम्राज्य उभी राहिली आणि कोसळली देखील परंतु या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी, ज्या शक्तीनी आपल्या कार्याने समाज हित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना ज्यानी सर्वोच्च मान दिला त्या अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. त्यांच्या जीवनाने सिद्ध केले की एका स्त्रीचे नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरते मर्यादित नाही तर ते समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचू शकते. अशा धर्मरक्षक, राजमाता, महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या



त्रिशताब्दी जयंतीचा उत्सव करणे म्हणजेच स्त्रीशक्तीचा जयघोष करणे आहे,' असे गौरवोद्गार भाजपा नेते तथा माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी केले.

३१ मे रोजी भारतीय जनता पक्ष कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर, प्रा.कादर शेख सर, प्रा. प्रकाश बगमारे प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चा, चिडे सर, भाजपा ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष प्रा.डॉ. अशोक सालोटकर, महामंत्री प्रा. दिलीप जुमडे, राजू भागवत, शंकर सातपुते, रश्मीताई पेशने, वर्षा चौधरी, साधना सातपुते, बगमारे, तेलंग साहेब, घनश्याम चौके, मोरेश्वर गरफडे, संजय काकडे, रत्नाताई दंडवते, जामदार ताई व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची यशोगाथा सांगतांना प्रा.प्रकाश बगमारे म्हणाले की, त्या एका महिला शासकाचे उदाहरण आहे, ज्यांनी शक्ती आणि करुणा तसेच मूल्य आणि कृती यांचा समतोल साधला. अहिल्याबाई होळकर खरोखरच 'समाज्ञी संन्याशी' या पदवीच्या पात्र आहेत. एक अशी नेत्या जिने आपल्या लोकांच्या कल्याणासाठी निःस्वार्थपणे सत्ता वापरली. अहिल्याबाई होळकर यांनी संपूर्ण भारतातील मंदिरांचा जिर्णोद्धार केला. श्री तारकेश्वर, श्री गंगाजी, अहिल्या, द्वारकेश्वर, गौतमेश्वर यासह ९मंदिरांचे काम (पुन्हा)मणिकर्णिका घाट, दशाश्वमेध घाट, जनाना घाट, अहिल्या घाट, शीतला घाट या घाटांचे बांधकाम; उत्तरकाशी धर्मशाळा, रामेश्वर,पंचकौशी धर्मशाळा, कपिला धर्मशाळा इ.बांधकाम करण्याचे महान कार्य अहिल्यादेवी होळकर यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. अशोक सालोटकर यांनी तर उपस्थितांचे आभार राजू भागवत यांनी मानले.

**जल है तो कल है...**

# चंद्रपुर जिल्ह्यातील वाघांचे हल्ले रोखण्यासाठी आवश्यक कार्यवाही करा

## माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे वनविभागाला निर्देश

चंद्रपुर/प्रतिनिधी

जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दीड महिन्यात नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरत चालला आहे. ग्रामस्थ तसेच जनावरांच्या जीवित नुकसानीची गंभीरता लक्षात घेऊन, वनविभागाने वाघांच्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्याचे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत दिले.

मुल तालुक्यातील वाघांच्या हल्ल्यांत ठार झालेल्या नागरिकांसंदर्भात वन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत रामबाग विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला,



उपसंचालक (बफर) कुशाग्र पाठक, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, मूलचे मूलचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार मृदुला मोरे, विभागीय वनअधिकारी (प्रोटेक्शन) निकिता चौरे, आदींची उपस्थिती होती.

भगवानपुर गावातील वाढत्या मानव वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने कुंपण मंजूर करून घ्या, मुल तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगलामध्ये पडून असणारे बांबू कुंपणासाठी उपलब्ध करून द्यावेत. यासाठी वनविभागाने गावात जाऊन शेतकऱ्यांची नोंदणी करावी व शेतकऱ्यांना बांबूचा पुरवठा करावा. एफडीसीएमसह वनविभागाने कुंपणासाठी लागणारे अंदाजपत्रक तयार करावे, असे निर्देश आं. सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

# अंगणवाड्यांमध्ये 'आधारशिला बालवाटिका' नावाने नवीन अभ्यासक्रम

## ३ ते ६ वयोगटातील बालकांना उपयुक्त, यावर्षीपासून खेळीमेळीच्या वातावरणात होणार अंमलबजावणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नवीन शैक्षणिक सत्रापासून केंद्र शासनाच्या महिला बालविकास विभागाच्या वतीने तयार केलेली अभ्यासक्रमाची रचना जिल्ह्यातील अंगणवाड्यांतील बालकांना शिकविली जाणार आहे. अंगणवाड्यांतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने 'आधारशिला' या नावाने हा अभ्यासक्रम लागू केला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून हा अभ्यासक्रम अंगणवाडीत शिकविला जाणार आहे. इयत्ता पहिलीच्या वर्गात जाण्यासाठी बालकांना शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करणे हा प्रमुख उद्देश या योजनेचा आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आता नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली जाणार आहे. अंगणवाडीत मुलांचे शैक्षणिक भवितव्य घडवण्यासाठी 'आधारशिला बालवाटिका' या नावाने सुधारित अभ्यासक्रम राबवला जाणार आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागात बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडी केंद्रांमधून ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले जाते. आता यावर्षीपासून नवीन अभ्यासक्रम खेळीमेळीच्या वातावरणात शिकविला जाणार आहे.



### अंगणवाड्यांमध्ये आधारशिला अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ १ पासून तीन ते सहा वर्षे वयोगटांतील बालकांसाठी ही नव्या शिक्षणाची नांदी ठरेल. राष्ट्रीय शिक्षण थोरण २०२०च्या अनुषंगाने राज्य सरकारने अंगणवाड्यांसाठी 'आधारशिला बालवाटिका १', 'आधारशिला बालवाटिका २' आणि 'आधारशिला बालवाटिका ३' या नावाने सुधारित अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे.

महिला व बालविकास विभाग आणि शालेय शिक्षण विभाग यांच्या समन्वयातून त्याची अंमलबजावणी होणार आहे. अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शक पुस्तिका आणि साहित्य राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत उपलब्ध केले जाणार आहे.

### असा असेल अभ्यासक्रम

अभ्यासक्रमांतर्गत 'जादुई पिटारा, ई-पिटारा, आधारशिला किट्स, नवचेतना आणि प्री-स्कूल एज्युकेशन किट्स' यांसारख्या शिक्षण साहित्याचा वापर करण्यात येणार आहे. हे साहित्य खेळाधारित आणि कृतिप्रधान पद्धतीने मुलांच्या भाषिक, सामाजिक विकासावर भर देणार असल्याचे सांगण्यात आले.

### इमारतीही मिळणार...

या अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. ज्या अंगणवाड्या भाड्याच्या किंवा अपुऱ्या इमारतींमध्ये आहेत, त्या जवळच्या शाळांमध्ये स्थलांतरित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. विशेषतः ज्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीचा वर्ग चालतो, पण तीन वर्षांची बालवाटिका नाही, अशा ठिकाणी अंगणवाड्या एकत्र केल्या जातील. यामुळे बालकांचे शिक्षण अधिक सलग आणि अखंड होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नियमित वाचा ब्रम्हपुरी समाचार

# प्रतिकूल परिस्थितीतही यश मिळविणे शक्य - आम. विजय वडेट्टीवार

## काँग्रेसतर्फे गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

'यश मागून मिळवलं जात नाही ते मेहनतीच्या बळावर मिळवावं लागत. आपले जन्मदाते आई वडिल हेच खरे देव रुपी मार्गदर्शक असून तेच आपले गुरु पण आहेत. जीवनात यशाचे शिखर गाठायचे असेल तर आपले ध्येय विचलित होऊ देऊ नका. परिस्थिती कितीही विपरीत असली तरी त्यावर मात करून यश संपादन करणे शक्य आहे. फक्त स्वत:ला पूर्णत: झोकुन सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन विधिमंडळ पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रह्मपुरी येथे तालुका तसेच शहर काँग्रेस च्या वतीने आयोजित गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.



आयोजित सोहळ्यास अध्यक्ष म्हणून नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.एन.एस.कोकोडे, काँग्रेस जेष्ठ नेते प्राचार्य डॉ देविदास जगनाडे, सत्कार मूर्ती म्हणून यूपीएससी (आय.आर.एस) परीक्षा उत्तीर्ण भाग्यश्री नैकले, तालुका काँग्रेस अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जि.प.सभापती डॉ. राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, ब्रम्हपुरीचे माजी सरपंच नारायणराव बोकडे, काँग्रेस शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी पं.स. सदस्य थानेश्वर कायरकर, माजी सभापती नेताजी मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते तथा ओबीसी नेते उमेश कोराम, व्यापारी संघ अध्यक्ष इकबाल जेसानी, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मोंटू पिलारे, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष सोनू नाकतोडे, राजेश नैकले प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, आपल्या विधानसभा क्षेत्रातून अधिकाधिक अधिकारी घडावे याकरिता विदर्भातील सर्वात मोठी ई - लायब्ररी ब्रह्मपुरी शहरात उभारली. यात २०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचे अभ्यासक्रम पूर्ण करू शकणार. सोबतच शिक्षणात पुढे जाऊ शकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना आम्ही मदतही करणार. आपण मोठे अधिकारी झाले तरी आपल्या मातीचा अभिमान बाळगा व इतरांना माणूस म्हणून मदत करा असे बहुमूल्य मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले. तत्पूर्वी कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती यूपीएससी आयआरएस परीक्षा उत्तीर्ण भाग्यश्री नैकले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन पण सांगितले की, परिस्थितीचे कारण पुढे करून अपयशाला पदराशी बांधू नका. अपयशाने खचून न जाता सदैव प्रयत्नशील राहावे. माझ्या आयुष्यात विपरीत परिस्थितीवर मी मात करून केवळ वर्तमानपत्रे व मोजके पुस्तकातून आज यशाचे शिखर गाठले. आई-वडिलांची संस्कार व गुरुवर्य चे मार्गदर्शन या यशात यांचा मोलाचा वाटा असून ओबीसी खात्याचे मंत्री असताना ओबीसी विद्यार्थ्यांकरीता महाज्योती संस्था स्थापन करणारे विधिमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वेळोवेळी सहकार्यामुळेच मला आज यश मिळवता आले असे तिने आवर्जून सांगितले.

त्यानंतर ब्रह्मपुरी तालुक्यातील इयत्ता दहावी व बारावी तसेच महाविद्यालयीन, स्पर्धा परीक्षा, सैनिकी परीक्षा मध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर पोपटे, प्रास्ताविक डॉ. राजेश कांबळे तर आभार प्रदर्शन तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष खेमराज तिडके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता युवक काँग्रेस शहर अध्यक्ष सुरज मेश्राम, जनसंपर्क अधिकारी सुधीर पंदीलवार व काँग्रेस पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

# समृध्दी महामार्गाकरीता जमीन मोजणीस गेलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांचा मोजणीस मज्जाव



ब्रह्मपुरी/का.प्र.

भंडारा ते गडचिरोली समृद्धी महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित होणार आहेत. मागण्या करण्यापूर्वीच मोजणीसाठी महसूल विभागाचे पथक शुक्रवारी दि. ३० मे रोजी बोरगाव शिवारात पोहोचले. त्यामुळे शेतकऱ्यांनी विरोध केला. परंतु, पोलिस बंदोबस्तात मोजणी सुरू ठेवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. भंडारा ते गडचिरोली राष्ट्रीय समृद्धी राज्य महामार्ग तयार होणार आहे. यामध्ये तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी या महामार्गासाठी अधिग्रहित केल्या जाणार आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता शेतकऱ्यांना ७/१२ आणि सर्व्हे नंबर व गट नंबरची प्रत देऊन मोजणीची नोटीस पाठविण्यात आली.

प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य केल्याशिवाय मोजणी करू नये

जमिन अधिग्रहित करण्यापूर्वी या भागातील शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्या त्यानंतरच मोजणी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून करण्यात आली. या महामार्गास ब्रम्हपुरी तालुक्यांतील बऱ्याच गावातील शेतकऱ्यांनी जमीन मोजणीस तीव्र विरोध केला आहे.

# घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना लवकरच निधी

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील एकूण ६६३ लाभार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत घरकूल मंजुरी प्रदान करण्याकरिता तत्कालीन पालकमंत्री नाम. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे माध्यमातून ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर यांनी प्रयत्न केले. त्यातील ६६३ पैकी ४४७ लाभार्थी पात्र ठरले आहेत. मात्र या पात्र झालेल्या लाभार्थ्यांना अजून पर्यंत निधीची उपलब्धता झाली नाही. दरम्यान माजी खासदार अशोक नेते यांनी सावली तालुक्याला निधी उपलब्ध करून दिला ही माहिती प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाली. या महत्त्वपूर्ण बाबीची दखल घेऊन प्रा.अतुल भाऊ देशकर यांनी ब्रह्मपुरी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना निधीची उपलब्धता व्हावी, याकरिता ब्रह्मपुरी तालुका महामंत्री तथा माजी सभापती प्रा.रामलाल दोनाडकर, भाजपा तालुका उपाध्यक्ष तथा सरपंच अनिल तिजारे यांचे शिष्टमंडळ अतुल देशकर यांच्या सूचनेनुसार अशोक नेते यांना भेटायला गेले.

माजी खासदार अशोक नेते यांनी तात्काळ दखल घेऊन नाम. गोरे साहेब मंत्री, ग्रामीण विकास विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई; तसेच नाम. अशोक उईके मंत्री, आदिवासी विकास विभाग तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांच्याशी सविस्तर चर्चा करून लवकरच निधीची पूर्तता करावी अशी मागणी केली माजी खासदार अशोक नेते यांनी भ्रमणध्वनीद्वारे यशस्वी चर्चा केल्यानंतर या दोन्ही वरिष्ठ मंत्र्यांना निवेदन देखील तात्काळ पाठविले आहेत.

यामुळे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल अंतर्गत निधीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाभार्थ्यांना लवकरच निधीची उपलब्धता होणार आहे. घरकुलचे स्वप्न साकार होणार अशी प्रतिक्रिया माजी खासदार अशोक भाऊ नेते आणि माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी दिली आहे. सदर माहिती प्रा.संजय लांबे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

# यावर्षीही दमा औषधीचे वितरण नाहीच

देसाईगंज/प्रतिनिधी

तालुक्यातील कोकडी येथील वैद्यराज प्रल्हाद कावळे यांच्या वतीने मागील ३५ वर्षांपासून दमा रूग्णांना मृग नक्षत्राच्या पवार्वर निःशुल्क आयुर्वेदिक औषधाचे वितरण करण्यात येत होते. मात्र मागील वर्षाप्रमाणेच यंदाही वैद्यराज प्रल्हाद कावळे यांच्या प्रकृती अस्वस्थामुळे ०८ जून २०२५ ला औषधीचे वितरण होणार नसल्याची माहिती वैद्यराज कावळे व कुटूंबियांनी दिली आहे.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर तीन वर्षे औषध वितरण बंद असल्याने दोन वर्षापुर्वी देसाईगंज येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात औषध वितरण करण्यात आले होते. मात्र मागील वर्षापासून वैद्यराज प्रल्हाद कावळे यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने दमा औषधीचे वितरण होणार नसल्याची माहिती आहे.

❀❀❀❀❀❀

**... QUOTES ...**

**"A great man is different from an eminent one in that he is ready to be servant of the society."**

**- Dr. Babasaheb Ambedkar**

**चा रो ळी**

*नको करू पाण्यात चिखल*
*कुणीतरी हे पाणी पिणार आहे...*
*जीवन स्वच्छ राहु दे... तुला पाहून,*
*कुणीतरी जीवन जगणार आहे...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

- ब्रह्मपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# स्वा. सावरकर हे भारतीय संस्कृतीची युगानुकूल मांडणी करणारे महापुरूष - डॉ. राजेंद्र नाईकवाडे

ब्रम्हपुरी/का.प्र.

'आपल्या भारतीय संस्कृतीचे व ज्ञानपरंपरेचे आधुनिक युगामध्ये पुनरुज्जीवन करणारे व युगानुकूल मांडणी करणारे एक महापुरुष जे आजही आपल्याला प्रेरणा देतात ते म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होय. सावरकरांचे काव्य, त्यातील शब्दकळा, प्रतिभाशक्ती, प्रतीके, त्यातील भव्य-दिव्यता हे इतके विलक्षण आहे की तुम्ही




त्यांच्या केवळ काही कविता जरी वाचाल्या तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाची विराटता आपल्या अनुभूतीस येईल. सावरकरांच्या केंद्रस्थानी प्रेम होते व अशा प्रकारचे मन लाभलेले कवी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असतात,' असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी ब्रह्मपुरी येथील विठ्ठल-रुक्मिणी सभागृहात सावरकर जयंती समारोहामध्ये केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर साहित्य अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ व भारतीय विचार मंच, ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने सावरकर जयंती समारोहाचे आयोजन ब्रह्मपुरी येथे करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे आणि प्रमुख अतिथी म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी चे अध्यक्ष प्रा. अतुल देशकर उपस्थित होते. तसेच गोंडवाना विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य गुरुदास कामडी, डॉ. संजय गोरे, प्रशांत दोंतुलवार, अधिसभा सदस्य संजय रामगीरवार, स्वरूप तारगे, भारतीय विचार मंचाचे सतीश शिनखेडे, स्वा. वि. दा. सावरकर साहित्य अध्यासन केंद्राचे प्रस्तावक यश बांगडे व समन्वयक डॉ. चैतन्य शिनखेडे व समिती सदस्य विद्याधर भाई, धनंजय गहाणे व किरण कापगते हेसुद्धा उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. कावळे म्हणाले की सध्याच्या तरुणांना स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे तेजस्वी व्यक्तिमत्व समजावून सांगण्याची गरज आहे. गोंडवाना विद्यापीठाच्या विविध अध्यासन केंद्रांमार्फत महापुरुषांचे विचार लोकांपर्यंत पोहचत आहे. तत्पूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुदास कामडी यांनी केले तर जयंतराव पिंपळापुरे यांनी वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मत्ते व आभार प्रदर्शन यश बांगडे यांनी केले.

**पाणी अडवा, पाणी जिरवा...**

# 'नवोदय'च्या सहावीसाठी अर्ज प्रक्रिया सुरु

## मुलांच्या पालकांना २९ जुलैपर्यंत अर्ज करता येणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

नवोदय विद्यालय समिती अर्थात एनव्हीएसने जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या जागांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७च्या जागांसाठी ही अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक मुलांचे पालक २९ जुलैपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. नवोदयच्या सहावीच्या जागांसाठी प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश देण्यात येत आहे.

जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या जागांसाठी प्रवेशासाठी इच्छुक मुलांच्या पालकांना ऑनलाइन अर्ज करावा लागेल. अर्ज ऑनलाइन cbseitms.rcil.gov.in या अधिकृत वेबसाइटवर करता येईल.

प्रत्येक जवाहर नवोदय शाळेत इयत्ता सहावीसाठी ८० जागा आहेत. जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशासाठीची परीक्षा १०० गुणांची आहे. २ तासांच्या वेळेच्या मर्यादेत असलेल्या या प्रवेश परीक्षेत अंकगणित, भाषा आणि मानसिक क्षमतेशी संबंधित प्रश्न विचारले जातात. चुकीच्या उत्तरांसाठी कोणतेही नकारात्मक गुण नाहीत. दिव्यांग मुलांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी अतिरिक्त ४० मिनिटे दिली जातात. परीक्षा दोन टप्प्यात घेतल्या जातील. प्रवेशासाठी परीक्षेचा पहिला टप्पा १३ डिसेंबर २०२५ रोजी प्रस्तावित आहे, तर परीक्षेचा दुसरा टप्पा ११ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येईल. जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीमध्ये प्रवेशासाठी वयोमर्यादा निश्चित केली आहे. ज्या अंतर्गत फक्त १० ते १२ वर्षे वयोगटातील मुलेच प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. वयोमर्यादा १ मे २०१४ ते ३१ जुलै २०१६ पर्यंत मोजली जाईल. म्हणजेच, मुलाचा जन्म त्या दरम्यान झाला असावा. जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीमध्ये प्रवेशासाठी इतर पात्रता निकषदेखील नमूद केलेले आहेत.

महत्त्वाचे म्हणजे संबंधित विद्यार्थी ज्या जिल्ह्यातील शाळेतून पाचवी उत्तीर्ण झाला असेल, त्याच जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या वर्गात त्याला प्रवेशासाठी अर्ज करता येईल. अर्ज करण्यासाठी पासपोर्ट आकाराचा फोटो, मुलाची स्वाक्षरी, आधारकार्ड, निवास प्रमाणपत्र, इयत्ता पाचवीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**वाचाल तर वाचाल..**

# बाबुराव दोनाडकर तथा रविंद्र पिलारे यांच्या सेवानिवृत्तीपर सत्कार सोहळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

आयुष्याची अनेक वर्ष सेवेत दिल्यानंतर शासकीय सेवेतून निवृत्त होतांनाचे भावनिक क्षण जेवढे आनंदाचे तेवढेच



दुःखाचे. असाच आनंदमय भावपूर्ण सोहळा नुकताच शिक्षक सहकारी पतसंस्था सिंदेवाही (ब्रम्हपुरी शाखा) व भर्रे फार्म हाऊस बोरगाव येथे संपन्न झाला. सेवानिवृत्त शिक्षक बाबुरावजी दोनाडकर जि.प.उच्च प्राथमिक शाळा बेटाळा व रविंद्र पिलारे जि.प.प्राथमिक शाळा मुडझा हे दोघेही नियत वयोमानानुसार ३१ मे २०२५ ला निवृत्त झाले.

बाबुरावजी दोनाडकर यांचे सेवानिवृत्तीपर सत्कार सोहळा प्रसंगी सुरेश बुराडे, मोहनदास बोरकुटे,उषा ढोके, रामेश्वर सेलोटे, रतिराम चौधरी, शिक्षक संघाचे अध्यक्ष नरेश ठक्कर, मनोहर शेंडे, संतोष आंबोरकर, दिलिप बावनकर यांनी शुभेच्छापर संदेश दिला. सर्वांच्या शुभेच्छा संदेशातून दोनाडकर सरांच्या जीवनपद्धती व कार्यशैलीवर प्रकाश टाकला. दोनाडकर सरांनी आपल्या मनोगतातून वेळेचे पालन, कार्यकुशलता, संघटनकार्य इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. सौ.शालिनीताई दोनाडकर यांनी देखिल आपले भावनिक मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक गंगाधर पिलारे व संचालन वर्षा रिठे तर आभार प्रदर्शन अल्का भुते यांनी केले.

रविंद्रभाऊ पिलारे यांच्या सत्कार सोहळा प्रसंगी मोरेश्वर कोलते,रतिराम चौधरी , उषा ढोके , विनोद सातव,दिलिप बावनकर, बाबुराव दोनाडकर, शरद दर्वे,ब्रम्हपुरी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय रामटेके, शिक्षक संघाचे अध्यक्ष नरेश ठक्कर , लोकनाथ बोरकर या सर्वांनी शुभेच्छा पर संदेश दिला. सत्कार मुर्ती रविंद्रभाऊ पिलारे यांनी संघटनकार्य, सामाजिक कार्य, कौटोंबिक जाणीव इत्यादी विषयावर समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद राऊत यांनी व संचालन वर्षा रिठे तर आभार प्रदर्शन अमोल सडमाके यांनी केले.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते (पान क्र. ९ वरून) स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# ब्रम्हपुरी तालुक्याच्या सेवेत अद्ययावत शववाहिका




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहर व ग्रामीण क्षेत्र अंतर्गत दुर्गम भागात तसेच अवघड क्षेत्र भागातील नागरिकांचे सुविधेकरिता स्वकियांचे मृतदेह सुलभतेने नेण्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभाग,चंद्रपूर जिल्हा अंतर्गत नगर परिषद ब्रम्हपुरी करिता अद्ययावत सुविधेने परिपूर्ण असलेली शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर शववाहिका नागरिकांच्या सेवेत अत्यल्प शुल्क भरणा करून नगर परिषद ब्रम्हपुरी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ब्रम्हपुरी शहरालगत असलेले ग्रामीण परिसरात स्वाकियांचे मृतदेह नेण्याकरण्याकरिता नागरिकांना फायदा होणार आहे. या वाहनात deep freezer सुविधा उपलब्ध आहेत. सदर शववाहिका उपलब्ध करून देण्याबाबत न.प.च्या प्रशासक तथा मुख्याधिकारी श्रीमती अर्शीया जुही यांनी जिल्हाधिकारी यांचे आभार मानले. तसेच सदर शववाहिका मागणी नुसार तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.


बुधवार बंद - दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404